(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT /Vol. XII / Issue – I ISSN 2277-8063

# महात्मा गांधींचे आर्थिक विचार वास्तव

**प्रा. नितीन पांडुरंग खारतोडे** विभाग प्रमुख अर्थशास्त्र विभागॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, शारदाबाई पवार महिला कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय शारदानगर बारामती.

---

**प्रस्तावना:-** महात्मा गांधींचा जन्म 2 ऑक्टोबर 1869 साली गुजरात मधील पोरबंदर येथे झाला. महात्मा गांधी यांचा आर्थिक विचारावर नामदार गोपाळ कृष्ण गोखले ,जॉन रस्किन यांच्या आर्थिक विचारांचा व ग्रंथांचा प्रभाव होता. आर्थिक विकास व मानवी कल्याण या दोन तत्वांना केंद्रीभूत मानून महात्मा गांधी यांनी स्वतःच्या आर्थिक विचारांची मांडणी केली आहे. भारताच्या मिश्र अर्थव्यवस्थेत आजमीतिला अनुभवास येणाऱ्या दारिद्र्य, बेरोजगारी ,आर्थिक विषमता या आर्थिक प्रश्नांना कसे सामोरे जाता येईल व अर्थव्यवस्थेतील समस्यांची सोडवणूक करण्यासाठी महात्मा गांधी यांनी मांडलेले विचार मौलिक व उपयुक्त आहेत.महात्मा गांधींनी आपल्या आर्थिक विचारांमध्ये मानवाचे अधिकाधिक कल्याण कसे साधले जाईल आणि मानवाच्या आर्थिक जीवनात येणाऱ्या नवनवीन आर्थिक आव्हानांना नवीन उपक्रम ,आर्थिक नियोजन व योजनांच्या माध्यमातून उपाय योजना सुचविल्या आहेत, ज्यामध्ये खेड्याच्या विकासाची संकल्पना ,विकेंद्रीकरणाचे महत्त्व, व्यक्तिमत्व विकासाची तत्वे, ग्रामस्वराज्य ,स्वदेशी , विश्वस्त संकल्पना या मूलभूत आर्थिक विचारांची मांडणी केलेली आहे.

**संशोधन अभ्यासाची उद्दिष्टे-:**

1. महात्मा गांधींच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या विचारांचा अभ्यास करणे.
2. अर्थव्यवस्थेतील मूलभूत आर्थिक समस्यावर महात्मा गांधींनी सुचवलेल्या उपाययोजनांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**:- प्रत्येक संशोधनाचे कार्य प्राथमिक आणि दुय्यम स्रोतांवर अवलंबून असते, सदर संशोधन पेपर दुय्यम स्रोत म्हणजेचसंदर्ग्रंथ ,जर्नल ,मासिके इ.आधारलेला आहे.

**1.ग्रामीण विकासाची संकल्पना**:- सामान्यता अर्थव्यवस्थेचे दोन प्रकार पडतात .एक म्हणजे भांडवलशाही अर्थव्यवस्था ज्यामध्ये उत्पादन साधनांची मालकी व निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य खाजगी व्यक्ती व संस्था यांच्याकडे असते तर दुसरी समाजवादी अर्थव्यवस्था ज्यामध्ये सरकार आर्थिक निर्णयाच्या बाबतीत सार्वभौम असते. मानवाच्या आर्थिक कल्याणाच्या दृष्टीने दोन्ही अर्थव्यवस्थांना मर्यादा पडतात. याला सक्षम पर्याय गांधीजींनी आपल्या आर्थिक विचारात मांडला आहे" खरा भारत खेड्यात आहे." खेड्यांकडे चला असा संदेश गांधीजींनी दिला कारण प्राचीन भारतात खेडी स्वावलंबी होती खेड्यामधील बारा बलुतेदार वस्तू विनिमय पद्धतीच्या आधारे एकमेकांच्या गरजा पूर्ण करत असल्याने त्यांना शहराकडे जाण्याची गरज नव्हती. भारताचा सर्वांगीण आर्थिक विकास होण्यासाठी खेडी नियोजन पूर्व पद्धतीने वसवली जावीत असा गांधीजींचा आग्रह होता. खेड्यामध्ये अन्न, वस्त्र ,निवारा ,आरोग्य ,पायाभूत शिक्षण ,वाहतूक दळणवळणाची साधने, स्वच्छ पिण्याची पाणी, मनोरंजनाची केंद्रे असावीत, सर्व व्यवहार सहकारी तत्त्वानुसार चालावेत असे मत खेड्याबाबत गांधीजींनी मांडले होते, आदर्श खेडी निर्माण झाली तर भारत सर्वच आघाड्यांवर स्वयंपूर्ण बनेल असा गांधीजींना विश्वास होता. सध्याच्या दारिद्र्य व बेरोजगारीची समस्या सोडवण्यासाठी हस्तू उद्योग लघुउद्योग कुटीर उद्योग या व्यवसायांना गांधीजींनी महत्त्व दिले. ग्रामीण अर्थव्यवस्था स्वयंपूर्ण करण्यासाठी त्यांच्यामध्ये खादी उद्योग ग्रामीण भागात स्थापन करावेत व शेती आधारित प्रक्रिया उद्योग काढावेत व वस्तूंची निर्मिती करावी व शहरातील बाजारपेठेच्या ठिकाणी विक्री केंद्र उघडावीत या गोष्टीसाठी ते आग्रही होते.

**2. यांत्रिकीकरण व विकेंद्रीकरण**: - महात्मा गांधींच्या मते जी यंत्रे मनुष्याचा रोजगार हिरावून घेतात व भारतासारख्या विपुल मनुष्यबळ असणाऱ्या राष्ट्रात दारिद्र्य व बेरोजगारीचे प्रमाण वाढवतात अशा भांडवल प्रधान तंत्राचा उत्पादन पद्धतीत वापर करणे अयोग्य आहेत. देशातील बेरोजगारी व दारिद्र्य कमी करण्यास अडथळा न आणणारी यंत्रे जरूर वापरली पाहिजेत असे त्यांचे मत होते. मोठी अवजड यंत्रसामग्री व कारखानदारी यामुळे शहरातील लोकसंख्या वाढेल पायाभूत सोयी सुविधांवरील ताण वाढेल काहींना काम मिळेल परंतु बहुसंख्य कामगार बेकार राहतील त्यामुळे महात्मा गांधी हे विकेंद्रीकरणाचा पुरस्कार करतात ,मोठ्या उद्योगांचे केंद्रीकरण हे समाजास

हानिकारक ठरेल असे मत त्यांनी व्यक्त केले होते. जर आपण घरगुती उत्पादन वेगाने वाढवले तर एकूण उत्पादन लाखो पटीने वाढेल ग्रामीण भागात स्थानिक गरजा नुसार लघु उद्योग व कुटीर उद्योग उभे केल्यास खेड्यांचा विकास होईल रोजगार व उत्पादनात वाढ झाल्यामुळे समाजातील अल्प उत्पन्न गटातील लोकांचे आर्थिक कल्याण साधले जाईल.

**3. व्यक्तिमत्व विकासाची तत्वे: -** महात्मा गांधीजींनी अर्थशास्त्राचा अभ्यास हा नैतिक व आध्यात्मिक सिद्धांतावर आधारलेला आहे. साधी राहणी व उच्च विचारसरणी हे तत्व मनुष्याने त्याच्या वैयक्तिक व सार्वजनिक सार्वजनिक जीवनात अंगीकारले तरच व्यक्तीचे सर्व आर्थिक प्रश्न आपोआप सुटतात असे त्यांचे मत होते.आर्थिक स्वावलंबतेमुळे भौतिक गरजा जरी वाढत असल्या तरी त्या मिळवण्यासाठी लालसा न बाळगणे व इतरांना जे मिळत नाही ते आपल्याला नको अशी वृत्ती जोपासणे हे मानवी जीवनाचे उद्दिष्ट पाहिजे, विकासाची अवस्था ही भौतिक अवस्था नसून मानसिक अवस्था आहे असे त्यांचे मत होते.

**4. स्वदेशीची संकल्पना: -** अखंड राष्ट्रीय एकात्मतेच्या बाबतीत महात्मा गांधीजींची स्वदेशीची कल्पना अत्यंत महत्त्वाची आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेला भेडसावणाऱ्या समस्या जसे की दारिद्र्य आरोग्य पशुपालन इत्यादी सोडवल्या तरच ग्रामीण खेडी नऊ उभारी घेतील असा गांधीजींना विश्वास होता ,महात्मा गांधींच्या अगोदर लोकमान्य टिळकांनी आपल्या चतुसूत्री कार्यक्रम स्वदेशी संकल्पना मांडली होती. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात ब्रिटिश भारतातील वसाहती मधून कच्चा माल स्वस्त दराने इंग्लंडला नेला जात असे व यंत्रावर पक्का माल तयार करून भारतीय बाजारपेठेत जास्त किमतीला विकून प्रचंड नफा कमवला जात असे .अशाप्रकारे संपत्तीचा मोठ्या प्रमाणावर इंग्लंडकडे वळवला जात होता यातून भारतीय अर्थव्यवस्थेचे मोठ्या प्रमाणावर शोषण झाले त्यावर उपाय म्हणून लोकमान्य टिळकांनी चतु:सूत्री कार्यक्रम सुरुवात केली त्यापैकी एक म्हणजे स्वदेशीचा महात्मा गांधींनी स्वीकार करून स्वदेशाबद्दल आत्मीयता निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

**5. विश्वस्त संकल्पना**: - आज भारतात बेरोजगारी वाढताना दिसत आहे. ग्रामीण भागातील हस्त उद्योग व कुटीर उद्योग आजच्या यांत्रिकीकरणाने नष्ट केले आहेत. पाश्चात्य देशातील औद्योगीकरणाचे प्रतिमान भारतासाठी हानिकारक ठरेल असे गांधीजींचे मत होते, पाश्चात्य प्रतिमान फक्त सक्षम व्यक्तींना रोजगार पुरवते व मूठभर भांडवलदारांचे हित साधत असल्यामुळे भारताची ग्रामीण अर्थव्यवस्था मोडकळीस येईल त्यामुळे खेड्यांचे आर्थिक शोषण होत आहे. महात्मा गांधीजींनी असे स्पष्ट केले होते की यंत्रे नष्ट करावीत या मताचे ते नाहीत तर त्यांना आवर घालावा त्यांना माणसाच्या मानगुटीवर बसू देऊ नये .संपत्तीतील विषमता दर दूर करायची असेल तर संपत्तीचे वाटप होण्यासाठी विश्वस्त कल्पना अत्यंत उपयुक्त आहे, श्रीमंत तसेच भांडवलदार वर्गाने खाजगी मालमत्तेचा त्याग करून विश्वस्ताचे कार्य केले तर अहिंसेच्या मार्गाने आर्थिक व सामाजिक समता निर्माण होण्यास मदत होईल. समता प्रस्थापित झाल्यामुळे दारिद्र्य ,बेरोजगारी, गुन्हेगारी, हिंसाचार यामध्ये घट होऊन देशाची आर्थिक भरभराट होईल. महात्मा गांधीजींनी मांडलेल्या आर्थिक विचार भारतीय अर्थव्यवस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी खूप मोलाचे आहेत असे दिसून येते .

**संदर्भ-:**

१.आर्थिक विचारांचा इतिहास फडके प्रकाशन कोल्हापूर पृष्ठ क्रमांक १५५.
२. अर्नाकीझम एनसायक्लोपिडीया ऑफ सोशल सायन्सेस खंड १ पृष्ठ क्रमांक ८७३ ते ८७७
३. महात्मा खंड ८ पृष्ठ क्रमांक २१४ ते २१६
४. महात्मा गांधी हिंदी आत्मचरित्र नवजीवन प्रकाशन अहमदाबाद १९२७ पृष्ठ क्रमांक १५५.